महा न्यूज & व्ह्यूज

11 SEP 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक गरज: कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक व्यवस्थेची महत्त्वाची गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच घटकांनी तयार असण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काल (दि. ९) केले.शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) आणि सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''ब्रिजिंग ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी: रिथिंकिंग नॉलेज इन ह्युमॅनिटीज अँड कॉमर्स'' या विषयावरील एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परिषदेचे मार्गदर्शक व अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्यूकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील, प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पारंपरिक व आधुनिक ज्ञान यांचा उत्तम संगम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विज्ञान, वाणिज्य व मानव्य विज्ञान यांच्या ज्ञानाचा मेळ घालून बहुविद्याशाखीय पद्धतीने ज्ञानदान आणि संपादन हा याचा कालसुसंगत ढाचा आहे. भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातूनही हे




उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न आहे. आजच्या शिक्षक, संशोधकांनी याचे भान सांभाळून नवी पिढी घडविण्यासाठी प्रतिबद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्र-कुलगुरू प्रमोद पाटील म्हणाले, नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेऊन डिजीटल ह्युमॅनिटीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, अर्थशास्त्र, कौशल्य, उद्योजकता यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्याच्या शक्यता आहेत. त्यांचा वेध तत्परतेने घेण्याचा हा कालखंड आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक डॉ. महादेव देशमुख म्हणाले, भारत हा जगामध्ये नॉलेज इकॉनॉमिक्सच्या माध्यमातून आणि वसुधैव कुटुम्बकम् या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने विकसित होऊ शकतो. भारतीय अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची असून २०२७ पर्यंत पाच ट्रिलीयन डॉलर आणि २०३० पर्यंत सात ट्रिलीयन डॉलर इतकी होवून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याची क्षमता बाळगून आहे.

परिषदेत डॉ. प्रवीण सप्तश्रृंगी (अमेरिका), डॉ. मदन मोहन गोयल, कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था (भारत सरकार), डॉ. अनुराग श्रीवास्तव (मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम (पॅलस्टाईन), डॉ. एफ. एम. नदाफ (गोवा), डॉ. विजयानंद सेल्वराज (अमेरिका) या मान्यवरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. परिषेदेत एकूण ७५० शिक्षक, संशोधक यांनी सहभाग घेतला. एकूण २५० जणांनी शोधनिबंध पाठविले. त्यातील निवडक १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्याची संधी देण्यात आली. परिषदेत अमेरिका, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, नायजेरिया इ. देशांतील संशोधक, तज्ज्ञांनी तर भारतातून राजस्थान, आसाम, पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश या विविध राज्यांतील २३० संशोधकांनी सहभाग घेतला. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. प्रमोद कांबळे, आर. डी. शिंगे यांनी परिश्रम घेतले.

11 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वसमावेशक अर्थनीतीची भारताला गरज

## डॉ. नरेंद्र जाधव : शिवाजी विद्यापीठात डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्काराने गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : 'सध्याच्या एकविसाव्या शतकात अमेरिका हा ढासळता मनोरा असून, चीन, रशिया, भारत ही नवी आर्थिक केंद्रे उदयास आली आहेत. भारताने यापुढील काळात अमेरिकेवर विसंबून राहून चालणार नाही. महान अर्थसत्ता बनण्यासाठी सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीचा भारताने अवलंब करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे डॉ. जाधव यांना 'प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार' कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी 'भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य : संधी व आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, शाल आणि ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. जाधव म्हणाले, 'आपल्या देशात १० लाख लोकसंख्येचा 'ऑक्टोपस क्लास' आहे, ज्याने देशातील ८० टक्के संपत्तीवर कब्जा केला आहे. भारतातील शेती उत्पादकता जगात सर्वात कमी आहे. सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांचीही सध्या बिकट अवस्था असून त्यांना मदतीची गरज आहे. थेट परकीय गुंतवणूकही जवळपास शून्य आहे. या वस्तुस्थितीचा विचार करून धोरणकर्त्यांनी देशात सर्वसमावेशक अर्थनीती आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. जे. एफ. पाटील यांचे विद्यापीठाच्या वाटचालीमध्ये मोलाचे योगदान आहे. भगवान महावीर अध्यासनाची इमारत हे त्यांचे स्वप्न आम्ही पूर्ण करीत आहोत. डॉ. जाधव म्हणजे दुर्दम्य इच्छाशक्ती, संधी शोधण्याची वृत्ती आणि त्यापायी कष्ट करण्याची प्रचंड तयारी याचे प्रतीक आहेत.'

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी खासदार संजय मंडलिक, डॉ. माणिकराव साळुंखे, बी. पी. साबळे, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, वासंती रासम, अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, श्रीकृष्ण महाजन, रघुनाथ ढमकले, जे. ए. जाधव, संजय ठिगळे उपस्थित होते. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून डॉ. जे. ए. जाधव, महादेव देशमुख, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, राहुल म्होपरे उपस्थित होते.

### परमस्नेह्याच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद

**'डॉ. जे. एफ. पाटील हे माझे परमस्नेही होते. पूर्णपणे कोल्हापुरी व्यक्तिमत्त्वाचा आणि सर्वांना जीव लावणारा असा हा आमचा सन्मित्र होता. माझ्या आयुष्यातील ७५ वा पुरस्कार हा या माझ्या परमस्नेह्याच्या नावे मिळाल्याचा मला मोठा आनंद वाटतो आहे', अशी भावना डॉ. जाधव यांनी व्यक्त केली.**

### शिक्षणावर पुरेपूर गुंतवणूक आवश्यक

**डॉ. जाधव म्हणाले, 'शिक्षण, सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रांवर पुरेपूर गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. खाणारी तोंडे वाढत असताना काम करणारे हात त्या प्रमाणात वाढावेत, अन्यथा, लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे रूपांतर लोकसंख्याशास्त्रीय आपत्तीमध्ये होण्याचा धोका सर्वाधिक असतो.'**

# देशात बेरोजगारीचा दर 30 टक्क्यांपेक्षा जास्त

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन : डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल अॅवॉर्डने डॉ. जाधव सन्मानित

**भारताची अर्थव्यवस्था २०२७ ला तीन नंबरची होणार आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु मानव कल्याणाचा निर्देशांकात जगातील १३५ व्या नंबरला भारत पोहचला आहे. परिणामी दारिद्र्याची विषमता वाढल्याने भुकेचा निर्देशांक १११ व्या नंबरला आहे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे भारतात बेरोजगारीचा दर ३० टक्क्यांनी वाढला आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्यावतीने डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल अॅवॉर्डने ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. जाधव म्हणाले, २०१६ नंतर तंत्रज्ञानात हळू-हळू प्रगती सुरू झाली. परंतु २०२० नंतर झपाट्याने तंत्रज्ञानात वाढ झाल्याने बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. भारताची अर्थव्यवस्था तीन नंबरची होणार, असे सरकारने जाहीर केले आहे. देशातील तरूणांमध्ये विलक्षण भेडसावणारी बेरोजगारी वाढत आहे. देशाची गुंतवणुक अर्थव्यवस्थेसाठी आश्वासक आहे, म्हणू शकत नाही. सरकारने योग्य गुंतवणूक केली नाही तर सामाजिक स्थैर्यावर वितरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

जातीनिहाय पाहू गेल्यास २२ टक्के उच्चवर्णीयांकडे ४१ टक्के संपती, तर २७ टक्के मागासवर्गियांकडे ११ टक्के संपती असे विषम वाटप दिसते. बेरोजगारीची समस्या दूर करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण आणले. परंतु ते कालविसर्जित ठरत आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल करून, कालानुरूप जोड देण्याची गरज आहे. एआय तंत्रज्ञानाच्या पुढची क्रांती तंत्रज्ञानात होणार असल्याने, हे शिक्षण शाळांमधून दिले पाहिजे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल अॅवॉर्डने सन्मानित करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. जे. ए. जाधव, डॉ. एम. एस. देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. राहुल म्होपरे.**

### दहा लाख लोकांकडे ८० टक्के संपत्ती

देशातील ऑक्टोप्लस क्लासमधील दहा लाख लोकांकडे ८० टक्के संपती आहे. परंतु इतर १४४ कोटी जनतेच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे देशाच्या धोरणकर्त्यांनी विचार करून सर्वसमावेशक अर्थव्यवस्था आणली पाहिजे. सरकारने वस्तुस्थितीला सामोरे जाण्याची गरज आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हा पुरस्कार म्हणजे आपल्या शिक्षकाप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय वाटचालीमध्ये डॉ. जाधव यांचे मोलाचे योगदान आहे. एक उत्तम अर्थशास्त्रज्ञ असण्याबरोबरच ते एक उत्तम माणूसही होते.

डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

### टॅरिफबद्दल देशाची योग्य भूमिका

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला टॅरिफ लावले तरी भारत डगमगला नाही. रशियाकडून तेल घेण्यास बंदी घालण्याचा प्रयत्न केला. तरीही भारताने टॅरिफबद्दल घेतलेली भूमिका योग्य आहे. म्हणूनच डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी माझे मित्र असल्याचे म्हंटले आहे.

### शिक्षण व आरोग्यावर खर्च करण्याची गरज

सरकारने शिक्षणावर ६ टक्के खर्च केला पाहिजे, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे. परंतु आजही शिक्षणावर फक्त ४ टक्के खर्च केला जातो. देशाने शिक्षणाविषयी हात आखडता घेतला आहे. आरोग्यवर फक्त एक टक्के खर्च केला जातो. त्यामुळे सरकारने शिक्षण व आरोग्यावर योग्य गुंतवणूक केली पाहिजे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
लोकमत




शिवाजी विद्यापीठाचा डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी प्रदान करण्यात आला.

# अमेरिका ढासळता मनोरा, भारताने विसंबून राहू नये

## डॉ. नरेंद्र जाधव यांचा इशारा : डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विसाव्या शतकात अमेरिका, पश्चिम युरोप आणि जपान ही तीन आर्थिक वृद्धीची केंद्रे होती. आज एकविसाव्या शतकात मात्र अमेरिका हा ढासळता मनोरा असून चीन, रशिया आणि भारत ही नवी आर्थिक केंद्रे उदयास आली आहेत. त्यामुळे भारताने यापुढील काळात अमेरिकेवर विसंबून राहून चालणार नाही, असा इशारा माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी बुधवारी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने डॉ. जाधव यांना प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, शाल, ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. जाधव म्हणाले, महान अर्थसत्ता बनण्यासाठी सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीचा भारताने अवलंब करण्याची आवश्यकता आहे. खाणारी तोंडे वाढत असताना काम करणारे हात त्या प्रमाणात न वाढल्यास सामाजिक अस्थैर्य निर्माण होऊन लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे रूपांतर लोकसंख्याशास्त्रीय आपत्तीमध्ये होण्याचा धोका सर्वाधिक असतो. डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह माजी खासदार संजय मंडलिक, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. बी. पी. साबळे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

**५१**
हजार रुपये रोख, मानपत्र, शाल, ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरूप.

### परमस्नेह्याच्या नावचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद

डॉ. जे.एफ. पाटील हे माझे परमस्नेही होते. आम्हा मित्रमंडळींत ते 'ज.फा.' म्हणूनच लोकप्रिय होते. पूर्णपणे कोल्हापुरी व्यक्तिमत्त्वाचा आणि सर्वांना जीव लावणारा असा हा आमचा सन्मित्र होता. माझ्या आयुष्यातील ७५ वा पुरस्कार हा या माझ्या परमस्नेह्याच्या नावे मिळाल्याचा मला मोठा आनंद वाटतो आहे, अशी भावना डॉ. जाधव यांनी व्यक्त केली.

महा न्यूज & व्ह्यूज

11 SEP 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीची भारताला गरज : डॉ. नरेंद्र जाधव

## शिवाजी विद्यापीठात डॉ. जे.एफ. पाटील स्मृती पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

महान अर्थसत्ता बनण्यासाठी सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीचा भारताने अवलंब करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने डॉ. जाधव यांना आज प्रा. (डॉ.) जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, शाल आणि ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते.



या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. नरेंद्र जाधव यांनी 'भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य: संधी व आव्हाने' या विषयावर अत्यंत तपशीलवार विवेचन केले. भारताच्या आर्थिक विकासाच्या जमेच्या बाजू अधोरेखित करीत असतानाच त्यावर परिणाम करणाऱ्या नकारात्मक बाजूंचा वेध त्यांनी घेतला आणि त्यावरील उपायांचेही मुद्देसूद सूचन केले. ते म्हणाले, भारत आज लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा सर्वाधिक लाभार्थी आहे, अशी मांडणी सातत्याने केली जात आहे आणि ती खरीही आहे. कारण भारताचे सरासरी आयुर्मान आज २८ वर्षे इतके आहे, जे जगातील अन्य राष्ट्रांच्या तुलनेत कितीतरी तरुण आहे. तथापि, या लाभांशाचे मूल्य कोऱ्या धनादेशाप्रमाणे आहे. तो जर आपण वठविलाच नाही, तर त्याचा लाभ शून्य आहे. म्हणून लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा लाभ उठवून आपण या मनुष्यबळाचा योग्य विनियोग केला पाहिजे. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन क्षेत्रांवर सर्वाधिक लक्ष्य केंद्रित करून त्यामध्ये पुरेपूर गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. खाणारी तोंडे वाढत असताना काम करणारे हात त्या प्रमाणात न वाढल्यास सामाजिक अस्थैर्य निर्माण होऊन लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे रुपांतर लोकसंख्याशास्त्रीय आपत्तीमध्ये होण्याचा धोका सर्वाधिक असतो, असा इशाराही त्यांनी दिला.

डॉ. जाधव पुढे म्हणाले, आपल्या देशात १० लाख लोकसंख्येचा 'ऑक्टोपस क्लास' आहे, ज्याने देशातील ८० टक्के संपत्तीवर कब्जा केला आहे. जातिनिहाय पाहू गेल्यास २२ टक्के उच्चवर्णीयांकडे ४१ टक्के संपत्ती, तर २७ टक्के मागासवर्गीयांकडे अवघी ११ टक्के संपत्ती असे विषम वाटप दिसते. भारतातील शेती उत्पादकता जगात सर्वात कमी आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचीही सध्या अवस्था बिकट आहे. त्यांना मदतीची गरज आहे. भारतात थेट परकीय गुंतवणूक वाढताना दिसत असली, तरी देशातून बाहेर होणारी गुंतवणूक आणि परदेशातून देशात होणारी गुंतवणूक यांचे समीकरण पाहता देशात होणारी ही गुंतवणूक जवळपास शून्य आहे. या वस्तुस्थितीचा विचार करून धोरणकर्त्यांनी देशात सर्वसमावेशक अर्थनीती आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. विसाव्या शतकात अमेरिका, पश्चिम युरोप आणि जपान ही तीन आर्थिक वृद्धीची केंद्रे होती. आज एकविसाव्या शतकात मात्र अमेरिका हा ढासळता मनोरा असून चीन, रशिया आणि भारत ही नवी आर्थिक केंद्रे उदयास आली आहेत. भारताने यापुढील काळात अमेरिकेवर विसंबून राहून चालणार नाही, असेही डॉ. जाधव यांनी यावेळी सांगितले.

**'परमस्नेह्याच्या नावचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद मोठा'**

डॉ. जे.एफ. पाटील हे माझे परमस्नेही होते. आम्हा मित्रमंडळींत ते 'ज.फा.' म्हणूनच लोकप्रिय होते. पूर्णपणे कोल्हापुरी व्यक्तीमत्त्वाचा आणि सर्वांना जीव लावणारा असा हा आमचा सन्मित्र होता. माझ्या आयुष्यातील ७५ वा पुरस्कार हा या माझ्या परमस्नेह्याच्या नावे मिळाल्याचा मला मोठा आनंद वाटतो आहे, अशी भावना यावेळी डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शिक्षकाविषयी विद्यार्थ्यांनी कशी कॉंतज्ञता व्यक्त करावी, याचा हा पुरस्कार म्हणजे वस्तुपाठ आहे. डॉ. जे.एफ. पाटील यांचे विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय वाटचालीमध्ये मोलाचे योगदान आहे. एक उत्तम अर्थशास्त्रज्ञ असण्याबरोबरच ते एक उत्तम माणूसही होते. सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यावरील अर्थशास्त्राचा प्रभाव दाखवून देण्याची आस त्यांना कायम राहिली. म्हणूनच अत्यंत सहजसोप्या भाषेत अर्थसंकल्पाचे विश्लेषण ते अखेरपर्यंत दरवर्षी करीत राहिले. भगवान महावीर अध्यासनाची इमारत हे त्यांचे स्वप्न होते. ते आता आम्ही पूर्ण करीत आहोत. डॉ. नरेंद्र जाधव म्हणजे प्रचंड इच्छाशक्ती, संधी शोधण्याची वृत्ती आणि त्यापायी कष्ट करण्याची प्रचंड तयारी याचे प्रतीक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचे 'आमचा बाप अन् आम्ही' हे आत्मचरित्र वाचलेच पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. जे.एफ. पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह माजी खासदार संजय मंडलिक, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. बी.पी. साबळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे डॉ. जे.ए. जाधव, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, डॉ. संजय ठिगळे, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, डॉ. पाटील यांचे कुटुंबिय यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
पुढारी

# बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही शैक्षणिक गरज

## कुलगुरू डॉ. शिर्के; आंतरराष्ट्रीय ई-परिषदेत ७५० संशोधकांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजच्या शैक्षणिक व्यवस्थेची महत्त्वाची गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच घटकांनी सज्ज राहण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) आणि कुरुंदवाड येथील सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ब्रिजिंग ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी: रिथिंकिंग नॉलेज इन ह्युमॅनिटीज अँड कॉमर्स' या विषयावरील एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परिषदेचे मार्गदर्शक व अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील, प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पप्पू अत्तार)**

### निवडक शोधनिबंध सादर

परिषदेत एकूण ७५० शिक्षक, संशोधक यांनी सहभाग घेतला. एकूण २५० जणांनी शोधनिबंध पाठविले. त्यातील निवडक १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्याची संधी देण्यात आली. परिषदेत अमेरिका, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, नायजेरिया इ. देशांतील संशोधक, तज्ज्ञांनी तर भारतातून राजस्थान, आसाम, पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांतून संशोधक सहभागी झाले.

परिषदेत डॉ. प्रवीण सप्तश्रृंगी (अमेरिका), डॉ. मदन मोहन गोयल, कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था (भारत सरकार), डॉ. अनुराग श्रीवास्तव (मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम (पॅलस्टाईन), डॉ. एफ. एम. नदाफ (गोवा), डॉ. विजयानंद सेल्वराज (अमेरिका) या मान्यवरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. प्रमोद कांबळे, आर. डी. शिंगे यांनी परिश्रम घेतले.

महा न्यूज & व्ह्यूज

11 SEP 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक गरज: कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक व्यवस्थेची महत्त्वाची गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच घटकांनी तयार असण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काल (दि. ९) केले.शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) आणि सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''ब्रिजिंग ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी: रिथिंकिंग नॉलेज इन ह्युमॅनिटीज अँड कॉमर्स'' या विषयावरील एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परिषदेचे मार्गदर्शक व अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्यूकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील, प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पारंपरिक व आधुनिक ज्ञान यांचा उत्तम संगम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विज्ञान, वाणिज्य व मानव्य विज्ञान यांच्या ज्ञानाचा मेळ घालून बहुविद्याशाखीय पद्धतीने ज्ञानदान आणि संपादन हा याचा कालसुसंगत ढाचा आहे. भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातूनही हे




उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न आहे. आजच्या शिक्षक, संशोधकांनी याचे भान सांभाळून नवी पिढी घडविण्यासाठी प्रतिबद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्र-कुलगुरू प्रमोद पाटील म्हणाले, नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेऊन डिजीटल ह्युमॅनिटीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, अर्थशास्त्र, कौशल्य, उद्योजकता यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्याच्या शक्यता आहेत. त्यांचा वेध तत्परतेने घेण्याचा हा कालखंड आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक डॉ. महादेव देशमुख म्हणाले, भारत हा जगामध्ये नॉलेज इकॉनॉमिक्सच्या माध्यमातून आणि वसुधैव कुटुम्बकम् या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने विकसित होऊ शकतो. भारतीय अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची असून २०२७ पर्यंत पाच ट्रिलीयन डॉलर आणि २०३० पर्यंत सात ट्रिलीयन डॉलर इतकी होवून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याची क्षमता बाळगून आहे.

परिषदेत डॉ. प्रवीण सप्तर्षी (अमेरिका), डॉ. मदन मोहन गोयल, कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था (भारत सरकार), डॉ. अनुराग श्रीवास्तव (मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम (पॅलस्टाईन), डॉ. एफ. एम. नदाफ (गोवा), डॉ. विजयानंद सेल्वराज (अमेरिका) या मान्यवरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. परिषेदेत एकूण ७५० शिक्षक, संशोधक यांनी सहभाग घेतला. एकूण २५० जणांनी शोधनिबंध पाठविले. त्यातील निवडक १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्याची संधी देण्यात आली. परिषदेत अमेरिका, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, नायजेरिया इ. देशांतील संशोधक, तज्ज्ञांनी तर भारतातून राजस्थान, आसाम, पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश या विविध राज्यांतील २३० संशोधकांनी सहभाग घेतला. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. प्रमोद कांबळे, आर. डी. शिंगे यांनी परिश्रम घेतले.

1 1 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन आजघडीची शैक्षणिक गरज : कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक व्यवस्थेची महत्त्वाची गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच घटकांनी तयार असण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) आणि सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ब्रिजिंग ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी : रिथिंकिंग नॉलेज इन ह्युमॅनिटीज अँड कॉमर्स' या विषयावरील एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. महादेव देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्यु.चे अध्यक्ष विजय पाटील, प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान, वाणिज्य व मानव्य विज्ञान यांच्या ज्ञानाचा मेळ घालून बहुविद्याशाखीय पद्धतीने ज्ञानदान आणि संपादन हा याचा कालसुसंगत ढाचा आहे. भारतीय ज्ञानप्रणालीच्या माध्यमातूनही हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न आहे. आजच्या शिक्षक, संशोधकांनी याचे भान सांभाळून नवी पिढी घडविण्यासाठी प्रतिबद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्यास संधी

परिषदेत अमेरिका, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, नायजेरिया इ. देशांतील संशोधक, तज्ज्ञांनी तर भारतातून राजस्थान, आसाम, पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश या विविध राज्यांतील २३० संशोधकांनी सहभाग घेतला.परिषदेत एकूण ७५० शिक्षक, संशोधक यांनी सहभाग घेतला. एकूण २५० जणांनी शोधनिबंध पाठविले. त्यातील निवडक १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्याची संधी देण्यात आली.

प्र-कुलगुरू प्रमोद पाटील म्हणाले, नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेऊन डिजिटल ह्युमॅनिटीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, अर्थशास्त्र, कौशल्य, उद्योजकता यामध्ये बदल घडवून आणण्याच्या शक्यता आहेत. त्यांचा वेध तत्परतेने घेण्याचा हा कालखंड आहे.

आयोजक डॉ. महादेव देशमुख म्हणाले, भारत हा जगामध्ये नॉलेज इकॉनॉमिक्सच्या माध्यमातून आणि वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने विकसित होऊ शकतो.

परिषदेत डॉ. प्रवीण सप्तश्रृंगी (अमेरिका), डॉ. मदनमोहन गोयल, कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था (भारत सरकार), डॉ. अनुराग श्रीवास्तव (मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम (पॅलस्टाईन), डॉ. एफ. एम. नदाफ (गोवा), डॉ. विजयानंद सेल्वराज (अमेरिका) या मान्यवरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा बीओएटीबरोबर सामंजस्य करार



कोल्हापूर : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या बीओएटीसमवेत सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, बीओएटीचे उपसंचालक डॉ. एन.एन. वडोदे. सोबत डॉ. सागर डेळेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. राजन पडवळ.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाबरोबर बोर्ड ऑफ अप्रेंटिसशीप ट्रेनिंग (बीओएटी) सामंजस्य करार करण्यात आला. विद्यार्थ्यांना रोजगार संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न आणि सहकार्य करेल, अशी ग्वाही केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या बोर्ड ऑफ अप्रेंटिसशीप ट्रेनिंगचे पश्चिम विभागीय उपसंचालक डॉ. एन. एन. वडोदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाने आपल्या सर्वच विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण व रोजगार संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या बोर्ड ऑफ अप्रेंटिसशीप ट्रेनिंगसोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराचे हस्तांतरण विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. वडोदे म्हणाले, रोजगारवृद्धी असलेला 'अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (एईडीपी) हा उपक्रम विद्यार्थ्यांना नोकरीची हमी देण्याच्या दृष्टीने लाभदायक ठरेल. त्यासाठी अभियांत्रिकीसह त्याखेरीजच्या विद्याशाखांतील विद्यार्थ्यांनाही प्रशिक्षण व रोजगार संधी उपक्रमात सामावून

- **विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल**

घेण्याचा बीओएटीचा मानस आहे. त्या दृष्टीने केंद्र सरकारने भरीव आर्थिक तरतूदही केलेली आहे. या अनुषंगाने बीओएटी प्रभावी मध्यस्थाची भूमिका बजावेल. बीओएटीसमवेत आजवर अनेक डिम्ड व स्वायत्त विद्यापीठांनी सामंजस्य करार केले आहेत. तथापि, शिवाजी विद्यापीठ हे अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे पहिले राज्य अकृषी विद्यापीठ आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने आजवर अनेक सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठासह परिक्षेत्रात बीओएटीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र व्यक्तीकडे जबाबदारी सोपविण्यात येईल. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुरेपूर न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजन पडवळ, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा वसतिगृहाचे उद्घाटन करताना क्रीडा अधिविभागाचे विद्यार्थी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. शरद बनसोडे आदी.

# शिवाजी विद्यापीठात क्रीडा वसतिगृहाचे उद्घाटन

- क्रीडा विभागाच्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय
- १६ कक्षांसह उपहारगृह आणि भोजन कक्षाची सुविधा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आज क्रीडा विभागासाठीच्या स्वतंत्र वसतिगृहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरूंनी हे उद्घाटन करण्याचा मान क्रीडा अधिविभागाच्या किरण लोहार, प्रतीक पाटील, रोहन दिवटे यांना मिळाला.

क्रीडा वसतिगृह तळमजला अधिक तीन मजले असे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात तळमजल्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. यामध्ये १६ कक्षांसह एक विद्युत कक्ष, कार्यालय, उपाहारगृह आणि भोजन कक्ष यांची सुविधा आहे. या वसतिगृहामुळे क्रीडा शिबिरे, प्रशिक्षण तसेच विविध स्पर्धांसाठी विद्यापीठात येणाऱ्या क्रीडापटूंच्या निवासासाठी कायमस्वरुपी सुविधा असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत करून वसतिगृहाची माहिती दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता हेमा जोशी, कंत्राटदार सतीश घोरपडे, मुंबईच्या साई प्रोजेक्ट कन्सल्टंट या आर्किटेक्ट कंपनीचे संदीप शेखर, अष्टविनायक इलेक्ट्रीकल्सचे राम बुधाजी खन्नुकर यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. किरण पाटील यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. राजेंद्र रायकर, सुभाष पवार, सुचय खोपडे, उपकुलसचिव रणजीत यादव, विजय पोवार, वैभव आर्डेकर, विद्युत अभियंता अमित कांबळे, शिवकुमार ध्याडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
सकाळ

# कॉ. शरद पाटील यांनी मांडले सामाजिक रचनेचे नवे प्रमाणशास्त्र

## सरोज पाटील : शारदाबाई पवार अध्यासनातर्फे चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १० : 'भारतीय सामाजिक रचनेचे यथायोग्य आकलन करून घेण्यासाठी कॉम्रेड शरद पाटील यांनी नवे प्रमाणशास्त्र विकसित केले आणि ते समाजासमोर मांडले. प्रमाणशास्त्र म्हणजे ज्ञान मिळविण्याच्या साधनांचे शास्त्र', असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सरोज पाटील यांची आज येथे केले.

विद्यापीठात मानव्यशास्त्र सभागृहामध्ये श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि सत्यशोधक प्रबोधन ट्रस्टतर्फे आयोजित



सरोज पाटील

'प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांचे स्त्रीदास्य व जातीदास्य विषयक चर्चाविश्व' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

सरोज पाटील म्हणाल्या, 'प्राच्यविद्यापंडित आणि कृतिशील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ख्याती असलेले कॉ. शरद पाटील यांनी कम्युनिस्ट चळवळीत सक्रिय होऊन आदिवासी, शेतमजूर यांच्याकरिता विविध लढे उभारले.

प्रा. प्रतिमा परदेशी म्हणाल्या, 'महाराष्ट्राच्या साहित्य व संस्कृतीच्या चळवळीमध्ये कॉ. शरद पाटील यांचे योगदान महत्त्वाचे आहे.'

डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
पुण्यनगरी

# शरद पाटील यांनी नवे प्रमाणशास्त्र विकसित केले

## सरोज पाटील; विद्यापीठात 'चर्चाविश्वा' चर्चासत्र

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारतीय सामाजिक रचनेचे यथायोग्य आकलन करून घेण्यासाठी कॉ. शरद पाटील यांनी नवे प्रमाणशास्त्र विकसित केले. प्रमाणशास्त्र म्हणजे ज्ञान मिळविण्याच्या साधनांचे शास्त्र, असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष सरोज पाटील (माई) यांनी केले.

कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि सत्यशोधक प्रबोधन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांचे स्त्रीदास्य व जातीदास्य विषयक चर्चाविश्वा विषयावर चर्चासत्राचे आयोजिन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले होते. चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी सरोज पाटील (माई) बोलत होत्या. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. उर्मिला दशवंत यांनी केले

यावेळी पाटील म्हणाल्या, कॉ. शरद पाटील कम्युनिस्ट चळवळीत सक्रिय होऊन आदिवासी, शेतमजूर यांच्यासाठी विविध लढे उभारले. आजच्या काळात, विद्यार्थ्यांप्रती शिक्षक नेहमी संवेदनशील असले पाहिजेत. प्रत्येक मुल गुणवत्तेचे आणि बुद्धिमत्तेचे लेणे घेऊन जन्माला येत असते, हे शिक्षकांनी ओळखून पैलू पाडण्याचे काम केले पाहिजे. झोपडपट्टीमध्ये राहणारी मुले शिक्षणामुळे आज लघुउद्योजक आणि आमदार झालेली आहेत. आईच्या कडकपणामुळे आम्हाला चांगली शिस्त लागली. त्यामुळे पुढील आयुष्यामध्ये अनेक कठीण प्रसंगी आम्ही कोठेही सैरवैर झालो नाही. सत्यशोधक प्रबोधन ट्रस्ट, पुणे येथील प्रा.प्रतिमा परदेशी मनोगतामध्ये म्हणाल्या, महाराष्ट्राच्या साहित्य व संस्कृतीच्या चळवळीमध्ये कॉ. शरद पाटील यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी इतिहास, संस्कृती, समाजकारण व अर्थशास्त्र या क्षेत्रांत लेखन केले. विचार हे जेव्हा जनमानसामध्ये पकड घेतात तेव्हा समाजामध्ये जागृती निर्माण होते. डॉ.रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार डॉ. नेहा वाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य टी. एस. पाटील, गौतमीपुत्र कांबळे, डॉ. निर्मला जाधव, सचिन गरूड, किशोर धमाले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2025
सकाळ

# विभागीय क्रीडा स्पर्धा मंगळवारपासून

## राधानगरी महाविद्यालय यजमान : विद्यापीठ व क्रीडा परिषदेची बैठक

राधानगरी, ता. १० : शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद यांच्यावतीने २०२५-२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या कोल्हापूर विभागीय स्पर्धांना १६ सप्टेंबरपासून प्रारंभ होत आहे. स्पर्धेचे यजमानपद राधानगरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राधानगरी महाविद्यालयाकडे आहे.

यासंदर्भात क्रीडा स्पर्धा आयोजन बैठकीसाठी शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मोहन नेवडे, कार्याध्यक्ष सुशील पाटील-कौलवकर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय केएमसी कोल्हापूर प्राचार्य प्रा. डॉ. बाबासाहेब उलपे, क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास पाटील व सचिव डॉ. नीलेश पाटील, डॉ. यवन आवळे व विविध महाविद्यालयांमधून ६५ शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.



कोल्हापूर : क्रीडा पुस्तिकेचे प्रकाशन करताना डॉ. शरद बनसोडे, डॉ. नीलेश पाटील व मान्यवर.

डॉ. बनसोडे म्हणाले, 'कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मिशन 'ऑलिंपिक' उपक्रमात शारीरिक शिक्षण संचालक व खेळाडूंनी मेहनत करावी. यासाठी विद्यापीठाने खेळाडूंसाठी अत्याधुनिक सिंथेटिक ट्रॅक, कुस्ती हॉल व क्रीडा वसतिगृह उपलब्ध करून दिले असून त्याचा लाभ घ्यावा.'

उपाध्यक्ष मोहन नेवडे म्हणाले, 'संस्था नेहमीच विद्यार्थी व खेळाडू हित जोपासत असून, विद्यापीठाने स्पर्धा आयोजनाचा बहुमान आम्हाला दिला. संस्था व महाविद्यालयातर्फे स्पर्धा वर्षभर चालणार असून, सर्वतोपरी सहकार्य करू.' कार्याध्यक्ष सुशील पाटील यांनी सर्व शारीरिक शिक्षण संचालकांना स्पर्धेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. या वर्षातील क्रीडा पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव डॉ. नीलेश पाटील यांनी स्वागत केले. प्रा. ए. आय. पटेल व प्रा. धनश्री बेलेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तौफिक नायकवडी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 1 SEP 2025
सकाळ

# दिवाळीनंतर हिवाळी सत्रातील परीक्षा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा दिवाळीनंतर होणार आहेत. या सत्रात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सुमारे दोन लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षांसाठी अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत २५ सप्टेंबरपर्यंत आहे.

विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा आणि त्यांचे निकाल जाहीर करण्याची बहुतांश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा घेण्याची तयारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सुरू आहे. या सत्रातील परीक्षांचा प्रारंभ दिवाळीनंतर ३० ऑक्टोबर रोजी होणार आहे. त्यात

> ‘उन्हाळी सत्रातील ९९ टक्के अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. आता हिवाळी सत्रातील परीक्षा घेण्याचे काम सुरू आहे. उत्तरपत्रिकांच्या ऑनस्क्रीन तपासणी, मूल्यमापन, आदींबाबत प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना माहिती दिली जात आहे.
>
> **- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

एम.ए., एम.कॉम., अशा पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरुवातीला होतील. त्यानंतर पाच नोव्हेंबरपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन परीक्षा मंडळाने केले आहे.

या परीक्षांसाठी एसआरपीडी प्रणालीद्वारे केंद्रांवर प्रश्नपत्रिका पाठविल्या जातील. त्याबरोबरच उत्तरपत्रिकांच्या ऑन स्क्रीन तपासणीमधील अभ्यासक्रमांचे प्रमाण वाढविले जाणार आहे. दरम्यान, हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह १५ सप्टेंबरपर्यंत, तर विलंब शुल्कासह १८ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे.

**प्रथम वर्षाचे मूल्यमापन महाविद्यालय करणार**

पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दोन्ही वर्षांच्या परीक्षा विद्यापीठातर्फे घेतल्या जाणार आहेत. पदवी प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाची जबाबदारी विद्यापीठ कॅम्पसमधील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांवर आहे.